**Estd 1962**
**Naac 'A++' Grade**

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रेस नोट

# दि. १८/८/२०२२

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल २०२२ उन्हाळी सत्राच्या परीक्षा दि.१९ जुलै २०२२ पासून सुरळीतपणे चालू झालेल्या आहेत. तथापि दि.१० ते १३ ऑगस्ट २०२२ रोजीच्या विद्यापीठाच्या सर्व परीक्षा हया नैसर्गिक आपत्तीमुळे पुढे ढकलण्यात आल्या होत्या. सदर परीक्षांचे सुधारित वेळापत्रके संकेतस्थळावर ठेवण्यात आली आहेत. दि.१७ ऑगस्ट २०२२ पासून विद्यापीठाच्या पूर्वनियोजित वेळापत्रकान्वये सर्व परीक्षा सुरळीतपणे सुरु आहेत.

नुकत्याच दि.१२ ऑगस्ट २०२२ रोजी बी.एस्सी. अंतिम सत्राच्या परीक्षांचे जाहीर करण्यात आलेल्या निकालामध्ये विद्यार्थ्यांकडून चुका झाल्याचे निदर्शनास आले आहे. उदा. ओ.एम.आर.शिट मधील विषयाचा सांकेतिक क्रमांक न लिहिणे, विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक व पीआरएन क्रमांक न लिहिणे, तसेच ओ.एम.आर.शिटमधील संबंधित वर्तुळ भरताना चुकीची वर्तुळे भरणे अथवा वर्तुळे न भरणे आदि चुका विद्यार्थ्यांकडून झाल्याचे दिसून येत आहे. यासंदर्भात सर्व आवश्यक त्या सूचना नमुना उत्तर पत्रिकेसह (ओ.एम.आर.शिट) सर्व महाविद्यालयात परीक्षेपूर्वीच अवगत करण्यात आली होती. ही सर्व माहिती विद्यार्थ्यांनी ओएमआर शिटमध्ये बिनचुकपणे नोंदविण्याची दक्षता घेणे आवश्यक होते. ज्या विद्यार्थ्यांनी ओ.एम.आर. शीटवरील माहिती अचूक भरली आहे अशा विद्यार्थ्यांचे निकाल अचूक जाहीर करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनी केलेल्या चुकामुळे त्यांच्या निकालामध्ये त्रुटी निर्माण झाल्या आहेत.

सर्व ओएमआर शिटस्चे स्कॅनिंगचे कामकाज विद्यापीठामध्ये सुरळीतपणे व बिनचूकपणे सुरु आहे. ज्या विद्यार्थ्यांनी वर नमुद केलेल्या चुकांमुळे संबंधित विद्यार्थ्यांच्या निकालामध्ये शुन्य अथवा परीक्षेस अनुपस्थित असा शेरा आला आहे. अशा संबंधित विद्यार्थ्यांच्या निकालातील त्रुटीचे निराकरण करण्यासाठी विद्यापीठाने महाविद्यालयाना परिपत्रकान्वये अवगत केले आहे.

ज्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रकामध्ये त्रुटी असतील अशा विद्यार्थ्यांनी आपापल्या महाविद्यालयाशी संपर्क साधून त्याबाबतचे आपले अर्ज महाविद्यालयामार्फत विद्यापीठाच्या परीक्षा विभागामध्ये तात्काळ पूरक माहितीसह सादर करण्यात यावेत. निकालातील त्रुटींचे निराकरणाचे कामकाज विद्यापीठामध्ये युध्दपातळीवर सुरु आहे. लवकरच सर्व त्रुटींचे निराकरण करुन संबंधित विद्यार्थ्यांचे परीक्षांचे सुधारित निकाल जाहीर करण्यात येत असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.अजितसिंह जाधव यांनी दिली.